सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422222

दूरध्वनी : 0253-2230580 फॅक्स :2231716

संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac

ज्ञानगंगा घरोघरी

**परीक्षा व नोंदणी विभाग**

जा.क्र. : पनिका/2018/ दिनांक : 05.01.2018.

प्रति,
मा. विभागीय संचालक,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विभागीय केंद्र,
द्वारा - अमरावती/औरंगाबाद/मुबंई/नागपूर/नाशिक/पुणे/कोल्हापूर/नांदेड

**विषय : शैक्षणिक सत्र 2017-18 : पूर्वतयारी शिक्षणक्रम नियमित तुकडी ऑनलाईन प्रवेश मुदतीबाबत ...**

महोदय,

आपल्या विद्यापीठाने शैक्षणिक सत्र 2015-16 पासून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आलेली होती त्यानुसार शैक्षणिक सत्र 2016-17 आणि 2017-18 साठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविलेली आहे, हे आपणांस माहिती आहेच. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांचे, अभ्यासकेंद्राचे, विभागीय केंद्राचे आणि विद्यापीठाचे काम अतिशय सुलभ झालेले आहे.

विद्यापीठामार्फत पूर्वतयारी शिक्षणक्रमाची **पहिल्या तुकडीची प्रवेश प्रक्रिया दिनांक 26.06.2017 ते दिनांक 30.09.2017** पर्यंत ऑनलाईन पध्दतीने करण्यात आली होती. ह्या कालावधीत पूर्वतयारी शिक्षणक्रमासाठी **30 हजार** विद्यार्थी प्रवेशित झाले होते. ह्यातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष बी.ए., बी.एस्सी, बी.कॉम. शिक्षणक्रमांना दिनांक 15 ते 30.12.2017 ह्या कालावधीत ऑनलाईन प्रवेश देखील घेतले आहेत.

विद्यापीठाच्या प्रचलित व नियमित पध्दतीने **जानेवारी ते मे 2018** या कालावधीत पूर्वतयारी शिक्षणक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असल्याने या तुकडीचे ऑनलाईन प्रवेशाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे असेल.

**पूवर्तयारी शिक्षणक्रम प्रवेश कालावधी दिनांक 08.01.2018 ते 28.02.2018 पर्यंत विनाविलंब असेल.**

आपापल्या विभागीय केंद्रांतर्गत असलेल्या अभ्यासकेंद्रांना पूर्वतयारी नियमित तुकडी प्रवेशाबाबत कल्पना द्यावी. ह्या तुकडीची परीक्षा ऑनलाईन पध्दतीनेच घेण्यात येईल. त्याबाबतचे नियोजन आपणांस नंतर कळविण्यात येईल. जास्तीत जास्त प्रवेश आपापल्या विभागात करण्यासाठी प्रयत्न करावेत.

सहकार्याबद्दल धन्यवाद ! कळावे.

आपला विश्वासू,

**प्रा.(डॉ.) अर्जुन घाटुळे,**
**परीक्षा नियंत्रक**

प्रत माहितीसाठी - 1. मा. कुलगुरू, यचममु विद्यापीठ,नाशिक 2. मा. कुलसचिव, यचममु विद्यापीठ,नाशिक, 3. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, यचममु विद्यापीठ, नाशिक, 4. मा. केंद्रप्रमुख/केंद्रसंयोजक, यचममु विद्यापीठ, तत्सम अभ्यासकेंद्र ह्यांना विनंती की, उपरोक्त कालावधीत पूर्वतयारी शिक्षणक्रमाची आपल्या पातळीवर जाहिरात व प्रसिध्दी करून अधिकाधीक प्रवेश ऑनलाईन करण्यात यावेत, ही विनंती.